# खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेण्याबाबत जाहीर नोटीस

उपजिल्हाधिकारी भूसंपादन
(सामान्य),वर्धा यांचे कार्यालय
दिनांक 01.4.2021

क्रमांक/मह. सहा/भूसं/खाजगी वाटाघाटी /कावि - 853 /2021

ज्या अर्थी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग ,वर्धा यांनी मौजा देऊळगाव ता. सेलू जि. वर्धा येथील जमीन पिपंळगाव गावाजवळ बोर नदीवर मोठया पूलाचे व रस्तयाचे बांधकामाकरीता शासन निर्णय् , महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण -03/2015/प्र.क्र.34/अ-2/दिनांक 12 मे 2015 व दिनांक 30 सप्टेबंर 2015 मधील तरतूदीस अनूसूरून खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग ,वर्धा यांचे नावाने घेणेबाबतचा प्रस्ताव भूसंपादन कार्यालयाकडे सादर केलेला आहे.

उक्त प्रस्तावासंबधी उक्त शासन निर्णय परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र. एलक्यु एन 01/2017 प्र.क्र.12/अ-2/दिनांक 25 जानेवारी 2017 प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

त्या अर्थी आता

1. उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतूदीनूसार मी , मनोजकूमार खैरनार, उपजिल्हाधिकारी भूसंपादन ,(सामान्य), जि.का.वर्धा याव्दारे

   (एक) अनूसूची – एक मध्ये नमूद खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,वर्धा यांचे नावे घेणेबाबत जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहे आणि

   (दोन) प्रकल्पासाठी जमीन थेट खरेदी पध्दतीने घेताना जिल्हास्तरीय समिती मार्फत् नविन भूसंपादन कायदा 2013 मधील कलम 26 ते 30 च्या शेडयुल -1 च्या तरतूदी नूसार संबधत जमीनीसाठी परिगणित होणा-या एकूण मोबदल्याच्या रकमेवर 25 टक्के रक्क्म वाढीव देऊन मोबदला निश्चित करण्यात येईल.

   (तीन) संबधित भूधारकाकडून शासनाच्या प्रचलीत धोरणाप्रमाणे खाजगी जमीन खाजगी वाटाघाटीव्दारे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग ,वर्धा यांचे नावे खरेदी देण्यास स्वेच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपूर्णत: व अंतिम रीत्या स्विकारण्यास तयार असल्याबाबतची संमतीपत्रे (विकल्प) मागवित आहे.

2. संबधित भूधारकांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर विहीत नमून्यातील संमतीपत्रे (विकल्प) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग ,वर्धा यांचेकडे दाखल करावीत.
3. संमतीपत्राचा (विकल्पाचा) नमूना कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग ,वर्धा यांच्या कार्यालया मार्फत भूधारकास उपलब्ध करून देण्यात येईल.
4. सदर प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या आराखडयाची प्रत उपजिल्हाधिकारी ,भूसंपादन ,(सामान्य), जि.का.वर्धा यांच्या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत भूधारकांना किंवा हीतसंबधीत व्यक्तींना तसेच जनतेस निरीक्षणासाठी खूली ठेवण्यात आली आहे.

# अनूसूची एक

## संपादन क्षेत्राच्या खरेदी द्यावयाच्या जमीनीचा तपशिल.

मौजा देऊळगाव ता.सेलू जि.वर्धा

| अ.क्रं. | गावाचे नाव | खातेदाराचे नाव | सर्वे नंबर | संपादन करावयाचे क्षेत्र (अदमासे) हे. आर मध्ये |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | मौजा देऊळगाव ता. सेलू जि.वर्धा | यशोदा गोविंदा केंदे | 261 | 0.10.15 |
| 2 | | शंकर बापूराव केंदे | 262 | 0.02.04 |
| 3 | | किसना न. नाकतोडे | 263 | 0.10.50 |
| 4 | | मोरेश्वर का. नाकतोडे | 257 | 0. 28.50 |
| 5 | | रमेश रा. नाकतोडे | 256-अ | 0.01.00 |
| 6 | | सचिन सू. केंदे | 283 | 0.09.00 |
| 7 | | सूभाष वा केंढे | 284 | 0.05.60 |
| 8 | | मोरेश्वर --- नाकतोडे | 285 | 0.02.50 |
| 9 | | आंनदराव मा. नागतोडे | 289 | 0.02.00 |
| 10 | | विठठल रा. कावलकर | 273 | 0.03.00 |
| 11 | | पूरूषोततम कावलकर | 290 | 0.29.00 |
| 12 | | रजत सू. चौधरी | 142 ब | 0.23.95 |
| 13 | | गोविंद कूबडे व इतर | 313 | 0.23.16 |
| 14 | | प्रशांत मा. चौधरी | 310 | 0.16.92 |
| 15 | | वासूदेव तेलंग व इतर | 314 | 0.04.00 |
| 16 | | शामा महादा कूमरे | 316 | 0.00.28 |
| 17 | | भाऊराव रा. कोठेकर | 317 | 0.16.58 |
| 18 | | आबादी महाराज देवस्थान | 318 | 0.14.58 |
| 19 | | रमेश गो कूबडे | 319 | 0.20.88 |
| 20 | | मारोती ह. हूड | 320 अ | 0.27.24 |
| | | | एकूण् | 2.50.88 |

तरी वर नमूद मिळकती बाबत कोणाचाही कोणताही हक्क् अधिकार असेलच अगर करार ,दावा असेल पतसंस्था ,वित्तीय संस्था, सरकारी कार्यालये, व निमसरकारी कार्यालय, आरक्षण असल्यास त्या सर्व पार्टी आणि व्यक्तींना या नोटीसांनी कळविण्यात येते की, सदरची नोटीस प्रसिध्द केल्यापासून 3 दिवसाच्या कालावधीत ,भूसंपादन (सामान्य),जिल्हाधिकारी कार्यालय ,वर्धा या पत्यावर त्याचे सदरहू मिळकतीबाबत असणारे हक्क् अधिकार दावा देणे-घेणे या संदर्भात आवश्यक त्या कागदपत्रानिशी समक्ष भेटून खात्री पटवून शहानिशा करावी .अन्यथा सदरची मिळकत निषेद, निकषर्जी निजोखीम आहे असे समजून खाजगी वाटाघाटीने खरेदी विक्री बाबत कार्यवाही करण्यात येईल तदनंतर कोणाची तक्रार अथवा हरकत ग्राहय धरली जाणार नाही याची सर्वानी नोंद घ्यावी.

(मनोजकूमार कि. खैरनार)
उपजिल्हाधिकारी भूसंपादन
(सामान्य),वर्धा

दिनांक :- 01/04/2021
ठिकाण :-

Sarika/lao 2020-21/Thet kharedi/देऊळगाव